॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

मलकापूर शिक्षण समिती, मलकापूर

व्दारा संचालित

# श्रीमती कावेरीदेवी केदारमल अग्रवाल कला-वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय मलकापूर

ता. मलकापूर, जि. बुलडाणा



305



# माहिती पुस्तिका

## 2023- 2024



S.K.A.MALKAPUR

## सूचना

१) ही विवरण पत्रिका काळजीपूर्वक वाचा व पुढील उपयोगासाठी जपून ठेवा. तुमचा प्रवेश अर्ज आवश्यक त्या दाखल्यासह प्रमाणपत्रासह व आवश्यक त्या शुल्कासह महाविद्यालयाच्या कार्यालयात दाखल करा.

२) प्रवेश मिळाल्यानंतर तुम्हास कोणत्याही कारणासाठी ताबडतोब महाविद्यालय सोडावयाचे असल्यास आवेदन पत्रासोबत भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

३) वर्गात नियमित राहण्यासंबंधी दक्षता बाळगा. वैद्यकीय सल्ल्यानुसार अथवा आवश्यक कारणासाठी अनुपस्थिती राहील्यास तत्संबंधी आवश्यक तो विनंती अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात योग्य वेळी सादर करा.

४) महाविद्यालयीन मालमत्तेची कोणत्याही प्रकारे नासधूस करता कामा नये.

५) सुचना फलकावर वेळोवेळी लावण्यात येणाऱ्या सुचनेकडे लक्ष ठेवुन त्याचे योग्य रितीने पालन करावे.

६) विद्यार्थ्यांनी वर्गातील अथवा बाहेरील वागणुक आपल्या बराबेरीच्या विद्यार्थ्यास त्रासदायक होणार नाही याची काळजी घ्यावी.

७) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याचे प्राध्यापक वर्गाशी व इतर संबंधीत कर्मचाऱ्यांशी वर्तणूक आदरपूर्वक असावी. महाविद्यालयाच्या आवारातील व बाहेरील दुर्वर्तन शिक्षेस पात्र ठरेल. अक्षम्य गैरवर्तणूकी करिता विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द होईल.

८) विद्यार्थ्याने ओळखपत्र महाविद्यालयाच्या परिसरात असतांना स्वत:जवळ नियमित ठेवावे. ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तके अथवा कार्यालयातील आवश्यक ते कागदपत्र मिळु शकणार नाही. तसेच त्याला वर्गात देखील बसता येणार नाही.

९) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर शिष्यवृत्तीचे अर्ज संपुर्ण दस्तऐवजासह विहीत ठरवुन दिलेल्या मुदतीत महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावेत. जे विद्यार्थी शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयात जमा करणार नाही अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची ठरवुन दिलेली संपुर्ण फी भरावी लागेल.

१०) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याने महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर काही कारणास्तव त्याला प्रवेश रद्द करावयाचा असेल अशा विद्यार्थ्याला प्रवेश रद्द करतांना महाविद्यालयाची पुर्ण फी भरावी लागेल.

११) विद्यार्थ्यांनी आपला Email ID तयार करावा व प्रवेश अर्जासह तो नमुद करणे आवश्यक आहे.

**✲ विशेष सुचना ✲**

महाराष्ट्र शासनाने रॅगिग संबंधी (शारिरीक, मानसिक छळासंबंधी) कायदा संमत केला आहे. तरी विद्यार्थ्यांनी कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची नोंद घ्यावी.



# मलकापूर एज्युकेशन सोसायटी, मलकापूर

## कार्यकारी मंडळ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. चैनसुख मदनलालजी संचेती | – | अध्यक्ष |
| २) | श्री. राजेश दत्तात्रय महाजन | – | उपाध्यक्ष |
| ३) | श्री. अशोक केदारमल अग्रवाल | – | सचिव |
| ४) | श्री. अभिजित चंद्रशेखर एदलाबादकर | – | सहसचिव |
| ५) | श्री. सोहनलाल बन्सीलाल संचेती | – | मॅनेजर |
| ६) | श्री. राहुल चैनसुख संचेती | – | कोषाध्यक्ष |
| ७) | श्री. प्रमोद श्रीधर डोरले | – | सदस्य |
| ८) | श्री. शक्तीसिंह रामसिंह राजपूत | – | सदस्य |
| ९) | श्री. कमलकिशोर राधाकिसन टावरी | – | सदस्य |
| १०) | श्री. रमेश हरीदास सदानी | – | सदस्य |
| ११) | श्री. राजेंद्र अशोक मोदे | – | सदस्य |
| १२) | श्री. समीर वसंतराव तुपकरी | – | सदस्य |
| १३) | श्री. डॉ. राहुल रमेश चोपडे | – | सदस्य |


**श्रीमती कावेरीदेवी केदारमल अग्रवाल,**
**कला–वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय, मलकापूर**
जि. बुलडाणा



Plate
1




# ।। विद्यापीठ गीत ।।

विद्या चिंतन । विद्या मंथन
विद्या सर्जन । विद्या जीवन ।।
जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले
संत गाडगेबाबा तुमचे स्वप्न पुर्ण झाले ।।
कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसूत्राचे अक्षर अक्षर, वेद नवा बोले ।। १ जनमन...
किती रंजले, किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मयोग निष्काम आचरुन, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओल्याव्याने, मानस मोहरले ।। २ जनमन...
धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडूनी मानवतेचे पूजन करतो
पिढ्यापिढ्यांचे जीवन दर्शन विश्वात्मक झाले ।। ३
जनमन सागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले ।।

**- प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ**



## ✻ कॉलेजची ठळक वैशिष्ट्ये ✻

१) विकसित क्रिडांगण
२) विभागवार इमारत, पुरेशा वर्गखोल्या आणि विपुल फर्निचर.
३) समृध्द ग्रंथालय आणि स्वतंत्र वाचनकक्ष.
४) प्रशिक्षित, अनुभवी आणि तज्ञ शिक्षक वर्ग.
५) कला-वाणिज्य शाखांतील पदवीपर्यंतचे शिक्षण.
६) राष्ट्रीय सेवा योजना.
७) स्थानिक जिल्हा पातळीवरील आणि विद्यापीठ स्तरावरील क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणारा सक्रीय
८) शारिरीक शिक्षण विभाग.
९) संगणकाची अद्यावत प्रशस्त लॅब.
१०) ICT वर्गखोल्या

## ✻ विद्यार्थ्यांसाठी विशेष सुचना ✻

१) वरीष्ठ महाविद्यालयातर्फे विद्यापीठ प्रतिनिधी निवड विद्यापीठाच्या घटना व सुचनेनुसार केली जाईल.
२) वर्ग प्रतिनिधीकडून विद्यापीठ प्रतिनिधीची निवड झाल्यानंतर वर्ग प्रतिनिधीचे पद रद्द समजले जाईल.
३) विविध विषयातील अभ्यासमंडळे प्राध्यापक परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार निर्माण करण्यात येईल.

## ✻ विद्यार्थ्यांच्या माहिती व मार्गदर्शनाकरिता सुचना ✻

महाविद्यालयामध्ये अथवा पदव्युत्तर शैक्षणिक विभागामध्ये प्रवेश घेतांना विद्यापीठाचे अध्यादेश नियम व परिनियम सर्व दुरुस्त्यासह माहिती करुन घेणे आवश्यक आहे. प्रवेशाकरिता खालील अध्यादेशातील तरतुदी नीट समजुन घेणे माहिती असणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| अध्यादेश क्रमांक १ | - | विद्यार्थ्यांचे नामांकनासंबंधी. |
| अध्यादेश क्रमांक २ | - | विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत. |
| अध्यादेश क्रमांक ४ | - | राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये सहभागी होणेबाबत. |
| अध्यादेश क्रमांक ५ | - | विद्यार्थ्यांचे शारिरीक स्वास्थ कल्याण. |
| अध्यादेश क्रमांक १० | - | सुट सवलत व पुढील वर्गात प्रवेश मिळणेबाबत. |
| अध्यादेश क्रमांक १२ | - | विद्यापीठ शुल्क संबंधी माहिती |
| अध्यादेश क्रमांक १०९ | - | पदवीकरिता विद्यार्थ्यांचा प्रवेश |
| अध्यादेश क्रमांक १९ | - | विद्यापीठाच्या दस्ताऐवजामध्ये नांव बदलविण्यासंबंधी |
| अध्यादेश क्रमांक १८५ | - | प्रोत्साहनात्मक गुणासंबंधी. |



Plate
2

S.K.A.MALKAPUR

# भारत सरकार शिष्यवृत्ती व राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना

## * अर्ज भरण्याबाबत सुचना *

वरीष्ठ महाविद्यालयातील सन २०२३-२०२४ या शैक्षणिक सत्रात प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती (SC), अनुसुचित जमाती (ST), विमुक्त व भटक्या जमाती (VJNT), विशेष मागास वर्ग (SBC), तसेच इतर मागास वर्गातील (OBC) मधील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांचे भारत सरकार शिष्यवृत्तीचे DBT अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह कार्यालयात जमा करावेत. मुदतीनंतर शिष्यवृत्तीचे अर्ज स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

** खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासनाने राजश्री शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना लागु केलेली आहे.*

**शिष्यवृत्तीच्या अर्जासोबत जोडावी लागणारी कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत.**

१) H.S.C. व S.S.C. गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत प्रत्येकी दोन.
२) टी. सी. ची झेरॉक्स प्रत दोन.
३) जातीचा दाखला व डोमेसाईल प्रमाणपत्र (राष्ट्रीय अधिवास प्रमाणपत्र) झेरॉक्स प्रत दोन.
४) उत्पन्नाचा दाखला तहसिलदारांच्या सहीचा जर वडिल नोकरी करीत असतील तर एकूण उत्पन्नाचा दाखला (उदा. मुळवेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते मिळुन होणारे एकूण उत्पन्न तसेच इतर मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न मिळुन)
५) विद्यार्थीनीचे बाबतीत लग्न झाले असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
६) जर विद्यार्थी दुसऱ्या जिल्ह्यातून शिक्षणासाठी आला असल्यास जिल्हा बदल प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
७) विद्यार्थी दुसऱ्या महाविद्यालयातून आला असल्यास मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळाल्याचा अथवा जी सवलत घेतली असेल त्या बाबतचा मंजुरी आदेश क्रमांकाचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
८) वडिल हयात नसल्यास वडिलांचा मृत्युचा दाखला जोडणे अनिवार्य आहे.
९) शिक्षणात खंड पडलेला असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे गॅप प्रमाणपत्र व शपथपत्र जोडणे अनिवार्य आहे.
१०) भारत सरकार शिष्यवृत्तीच्या अर्जावर स्वत:चा अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो जोडणे आवश्यक आहे.
११) शिष्यवृत्तीचे भरलेले अर्ज कार्यालयात जमा करते वेळी प्रवेश घेतल्याची पावती तसेच मागील वर्षाचा DBT युझर आयडी नंबर व पासवर्ड सोबत आणणे आवश्यक आहे.
१२) राष्ट्रीयकृत बँकेचे शिष्यवृत्ती खात्याची पासबुकाची झेरॉक्स दोन प्रतीत.
  अ) वरील सर्व कागदपत्रांची भा. स. शिष्यवृत्तीचे अर्जासोबत पुर्तता करणे अनिवार्य आहे. त्या शिवाय शिष्यवृत्ती मंजुर होणार नाही याची कटाक्षाने नोंद घ्यावी.
  ब) शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती बँक खात्यामध्ये जमा होत असल्यामुळे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते उघडणे अनिवार्य आहे.
  क) आधारकार्डला मोबाईल नंबर लिंक असणे अनिवार्य आहे. तसेच बँक खात्याला आधार व मोबाईल नंबर लिंक असणे अनिवार्य आहे. त्याशिवाय फॉर्म भरता येणार नाही.
१३) अनु. जाती व अनुसुचीत जमातीच्या प्रवर्गातील विद्यार्थी वगळता इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना २० रु. स्टँपवर हमीपत्र देणे अनिवार्य.
१४) आधार कार्डाची झेरॉक्स प्रत जोडणे अनिवार्य आहे.
१५) पासपोर्ट साईज फोटो (२ प्रती)
१६) आधारकार्ड बँक खात्याला लिंक झाल्याची पावतीची झेरॉक्स (३ प्रती)

**प्रा. एस. आर. राजपूत**
**प्राचार्य**



# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | प्रास्ताविक | १ |
| २) | संस्थेचे अंतर्गत कार्यरत असलेले शैक्षणिक उपक्रम | २ |
| ३) | अभ्यासक्रम | ३ |
| ४) | प्रवेश पात्रता | ५ |
| ५) | प्रवेश पध्दती | ६ |
| ६) | इतर शुल्क व निधी | ७ |
| ७) | वैद्यकीय तपासणी | ८ |
| ८) | भारत सरकारच्या मागासवर्गासाठी शिष्यवृत्त्या | ८ |
| ९) | शासकीय व इतर शिष्यवृत्त्या व सवलती | ८ |
| १०) | सर्व सामान्य शिस्त | ८ |
| ११) | ग्रंथालय | ८ |
| १२) | शारीरिक शिक्षण | ८ |
| १३) | राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) | ८ |
| १४) | परिक्षा वरीष्ठ महाविद्यालय | ९ |
| १५) | विद्यार्थी मंडळाच्या घटनेसंबंधी सुचना | ९ |
| १६) | अभ्यास मंडळे | ९ |
| १७) | विद्यापीठाची प्रोत्साहनपर गुण योजना | ९ |
| १८) | शैक्षणिक वर्षातील सुट्या | १० |
| १९) | भारत सरकार शिष्यवृत्ती अर्ज भरण्याबाबत सुचना | ११ |
| २०) | विद्यार्थ्यांसाठी विशेष सुचना | १२ |
| २१) | सुचना | १३ |




Plate
3

।। न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।।

**श्रीमती कावेरीदेवी केदारमल अग्रवाल कला-वाणिज्य**
**वरिष्ठ महाविद्यालय, मलकापूर, जि. बुलडाणा**

# विवरण पुस्तिका

# PROSPECTUS

## ❋ प्रास्ताविक ❋

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर उच्च शिक्षणाचा आमुलाग्र विचार करण्यासाठी सुप्रसिध्द शिक्षण तज्ञ डॉ. राधाकृष्णन (जे पुढे भारताचे राष्ट्रपती झाले) यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ अनुदान आयोग स्थापन करण्यात आला आणि महाविद्यालयीन शिक्षणाचा सर्वकष विचार करण्यात आला. शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या जाणत्या वयातील तरुण विद्यार्थी हा स्वतंत्र भारताचा भावी नागरिक म्हणून कसा तयार व्हावा याचा मुलगामी विचार आयोगाने केला.

बुध्दीच्या विकासाबरोबरच हृदयातील सौहार्द मनामनातील सामंजस्य वाढविणारे संस्कार, देशभक्ती, राष्ट्रीय भावनेचा परिपोष यातुन होणारा मनोविकास हे त्याचे उद्दीष्ट होते. ते साध्य करण्यासाठी विविध विषयांची रचना आणि आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान या माध्यमातुन भारतीय तरुणांची बौध्दिक आणि मानसिक जडण घडण कशी होईल याचाच तो मुलभूत विचार होता. त्याचेच हे सर्वकष असे चिंतन होते.

आज स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या महाविद्यालयीन शिक्षणाचे उद्दिष्ट त्या दृष्ट्या महापुरुषाने सांगितल्याप्रमाणे तेच असेल तरी ते साध्य करण्याची वाटचाल मात्र खुंटलेली दिसत आहे. ते आदर्श असे उद्दिष्ट साध्य करण्यासाठीच आणि सर्वांगीण प्रगतीचा मार्ग प्रशस्त करण्यासाठीच मलकापूर नगरात मलकापूर शिक्षण समिती या सर्वात जुन्या शिक्षण संस्थेचे गोविंद विष्णु महाजन विद्यालयाच्या परिसरात भव्य व सर्व सोयींनी युक्त अशा प्रशस्त इमारतीत उत्कृष्ठ व अनुभवी प्राध्यापक वर्ग, समृद्द वाचनालय, क्रिडांगण यासह **श्रीमती कावेरीदेवी केदारमल अग्रवाल, कला-वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय, मलकापूर जि. बुलडाणा** हे कला आणि वाणिज्य महाविद्यालयाची १३ वर्षाची यशस्वी वाटचाल पूर्ण झालेली आहे. तसेच या महाविद्यालयामध्ये **शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून वाणिज्य विभाग (इंग्रजी माध्यम) तुकडीची शासन मान्यता मिळालेली आहे.** हे प्रारंभी निवेदन करतांना संस्थेस अत्यानंद होत आहे.

*Entrance for Ideal Education*
*Preparation for Ideal Development*
*Performance for Ideal citizenship*



## १६. शैक्षणिक वर्षातील सुट्या (Holidays)

सर्व संबंधितांच्या माहितीकरिता अधिसुचित करण्यात येते की सत्र पध्दतीने (Semester Pattern) राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाकरिता शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता सुट्ट्या अनुक्रमे खालील तक्त्यांमध्ये दर्शविल्या प्रमाणे राहील.

### तक्ता क्र. १

**सत्र पध्दती** (Semester Pattern) (विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये)

| अ.क्र. | सत्र/दिर्घ सुटी | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | प्रथम सत्र | सोमवार ३ जुलै २३ ते २०२३ | मंगळवार दि. ७ नोव्हेंबर २०२३ |
| २ | हिवाळी दिर्घसुटी | बुधवार ८ नोव्हेंबर २०२३ | सोमवार दि. २७ नोव्हेंबर २०२३ |
| ३ | व्दितीय सत्र | मंगळवार २८ नोव्हेंबर २०२३ | शनिवार दि. २७ एप्रिल २०२४ |
| ४ | उन्हाळी दिर्घसुटी | सोमवार २९ एप्रिल २०२३ | सोमवार दि. १० जुन २०२४ |

### तक्ता क्र. २
### सुट्यांची यादी

| अ.क्र. | सण | दिवस दिनांक |
|---|---|---|
| १ | मोहरम | शनिवार दि. २९ जुलै २०२३ |
| २ | स्वातंत्र्य दिन | मंगळवार, दि. १५ ऑगस्ट २०२३ |
| ३ | पारशी नूतनवर्ष | बुधवार, दि. १६ ऑगस्ट २०२३ |
| ४ | रक्षाबंधन | बुधवार, दि. ३० ऑगस्ट २०२३ |
| ५ | श्रीगणेश चतुर्थी | मंगळवार, दि. १९ सप्टेंबर २०२३ |
| ६ | गौरीपुजन | शुक्रवार, दि. २२ सप्टेंबर २०२३ |
| ७ | अनंत चतुर्दशी/ईद-ए-मिलाद | गुरुवार, दि. २८ सप्टेंबर २०२३ |
| ८ | महात्मा गांधी जयंती | सोमवार, दि. २ ऑक्टोंबर २०२३ |
| ९ | दसरा | मंगळवार, दि. २४ ऑक्टोंबर २०२३ |
| १० | ख्रिसमस | सोमवार, दि. २५ डिसेंबर २०२३ |
| ११ | प्रजासत्ताक दिन | शुक्रवार, दि. २६ जानेवारी २०२४ |
| १२ | छत्रपती शिवाजी महाराज जयंत | सोमवार, दि. १९ फेब्रुवारी २०२४ |
| १३ | महाशिवरात्री | शक्रवार, दि. ८ मार्च २०२४ |
| १४ | होळी (दुसरा दिवस) | सोमवार, दि. २५ मर्चा २०२४ |
| १५ | गुड फ्रायडे | शुक्रवार, दि. २९ मार्च २०२४ |
| १६ | गुढीपाडवा | मंगळवार, दि. ९ एप्रिल २०२४ |
| १७ | रमझान ईद (ईद-उल-फितर) | गुरुवार, दि. ११ एप्रिल २०२४ |
| १८ | श्रीराम नवमी | बुधवार, दि. १७ एप्रिल २०२४ |



Plate 4

S.K.A.MALKAPUR

## १२. परिक्षा-वरीष्ठ महाविद्यालय (Sr. College) Test Tutorials, Seminar Exams.)

वरीष्ठ महाविद्यालयामध्ये घटक चाचण्या, गृहपाठ, चर्चासत्र व पूर्वपरीक्षा घेण्यात येतात. त्यांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विद्यापीठ परीक्षेला पाठवितांना विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयातील ७५ टक्के उपस्थिती असावी. तसेच त्याची अभ्यासाची प्रगती व वर्तणूक, समाधानकारक असावी, शारिरीक शिक्षण विभागातील उपस्थिती ८०% असावी. नियमाप्रमाणे उपस्थिती नसल्यास विद्यापीठाच्या परीक्षेला बसता येणार नाही.

## १३. विद्यार्थी मंडळाच्या घटनेसंबंधी सुचना

### (Notice regarding Students Union Constitution)

वरीष्ठ महाविद्यालया तर्फे विद्यार्थी प्रतिनिधीची निवड विद्यापीठाच्या घटना व सुचनेनुसार केली जाते.

## १४. अभ्यास मंडळे (Study circles)

विविध विषयातील अभ्यासेत्तर कार्यक्रम करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक परिषद विविध मंडळाची स्थापना करेल.

## १५. विद्यापीठाची प्रोत्साहनपर विशेष गुण योजना

### (Scheme for University Incentive Marks)

खेळ, क्रिडा, वक्तृत्व, नाट्य, संगीत, समाजसेवा इत्यादी पाठ्येतर कार्यक्रमासाठी सर्व शाखांतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर गुण देण्याची तरतुद अमरावती विद्यापीठाने केली आहे. मात्र विद्यार्थ्याला या विशेष गुण योजने अंतर्गत जास्तीत जास्त दहापर्यंत प्रोत्साहन गुण देण्यात येतात. स्नातक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी हे प्रोत्साहन गुण पुढील प्रमाणे दिले जातील.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अ) | गणराज्य दिन संचालनासाठी निवड | – ३ गुण |
| २. | अ) | संपुर्ण वर्षभर रा.से.यो. तील सहभाग | – ५ गुण |
| | ब) | एक कॅम्पसह रा.से.यो. तील वर्षभराचा सहभाग | – ६ गुण |
| | क) | दोन कॅम्पसह रा.से.यो. तील वर्षभराचा सहभाग | – ७ गुण |
| ३. | अ) | विद्यापीठ स्तरावरील क्रिडास्पर्धा व सामने यातील सहभाग (प्रत्येक खेळासाठी) | – ३ गुण |
| | ब) | आंतरविद्यापीठ क्रिडास्पर्धा व सामने यातील सहभाग (प्रत्येक खेळासाठी) | – ५ गुण |
| ४. | अ) | विद्यापीठाने मान्यता दिलेल्या आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धामधील सहभाग (वाद विवाद–नाटक–संगीत : प्रत्येक स्पर्धेसाठी) | – ३ गुण |
| | ब) | आंतरविद्यापीठ स्तरावरील वर नमुद केलेल्या सांस्कृतिक स्पर्धामधील सहभाग (प्रत्येक खेळासाठी) | – ४ गुण |
| ५ | अ) | रक्तदान (प्रत्येक वेळेसाठी) | – २ गुण |
| | ब) | कमाल गुण | – ५ गुण |
| ६ | | शासकीय योजने अंतर्गत आवश्यक असणारी सांख्यिकीय | – ५ गुण |
| ७ | अ) | गृहरक्षक दलातील सहभाग | – ३ गुण |
| | ब) | गृहरक्षक दलातील कॅम्पसहित सहभाग | – ५ गुण |





मलकापूर एज्युकेशन सोसायटी व्दारा संचालित,

# शैक्षणिक उपक्रम

- श्रीमती कावेरीदेवी केदारमल अग्रवाल कला–वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालय, मलकापूर
- गोविंद विष्णु महाजन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मलकापूर
- स्व. बबनराव देशपांडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मोताळा
- एम.ई.एस. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, धामणगांव बढे
- हिराबाई संचेती कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मलकापूर
- विवेकानंद प्राथमिक विद्यालय, मलकापूर
- सरस्वती प्राथमिक कन्या विद्यालय, मलकापूर
- एम.ई.एस. इंग्लीश स्कूल व ज्यु. कॉलेज, मलकापूर



S.K.A.MALKAPUR

Plate 5

# १. अभ्यासक्रम

विद्यापीठाच्या अधिसुचनेनुसार बी.ए. भाग १, २ व ३ व बी.कॉम. भाग १, २ व ३ करिता सेमिस्टर पध्दती अवलंबण्यात आलेली आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## १) कला विभाग

१) **प्रथम वर्ष कला** **(B.A. Part I) - Sem. I (CBCS) :**

| | |
|---|---|
| 1) Compulsary English (DSC) | 1001 |
| 2) Communication skill in English (AEC) | 1002 |
| 3) Marathi (DSC) | 1011 |
| 4) Communication skill in Marathi (AEC) | 1011 (P) |
| 5) History (DSC) | 1021 |
| 6) Economics | 1022 |
| 7) Political Science (DSC) | 1025 |
| 8) Marathi Literature (DSC) | 1052 |
| 9) Induction Programme | Ind01 |

२) **प्रथम वर्ष कला** **(B.A. Part I) - Sem. II (CBCS) :**

| | |
|---|---|
| 1) Compulsary English | 1001 |
| 2) Communication skill in English (AEC) | 1002 |
| 3) Marathi | 1011 |
| 4) Communication skill in Marathi (AEC) | 1011 (P) |
| 5) History | 1021 |
| 6) Economics | 1022 |
| 7) Political Science | 1025 |
| 8) Marathi Literature (DSC) | 1052 |

**Generic open Elective course :** i) Persnality Development & Soft Skill
ii) Discovery of Bharat

३) **व्दितीय वर्ष कला** **(B.A. Part II) Sem. III & IV :**
विषय CBCS पॅटर्ननुसार राहतील.

५) **तृतीय वर्ष कला** **(B.A. Part - III) Sem V** आणि **Sem. VI**
१) इंग्रजी आवश्यक (English Comp.) (ENG) (1001)
२) मराठी आवश्यक (Marathi Comp.) (MAR) (1011)
(ज्या विद्यार्थ्यांनी बी.ए. भाग १ व २ ला जे ऐच्छिक विषय अभ्यासासाठी घेतले असतील तेच विषय बी.ए. भाग ३ साठी राहतील.)



## ५. भारत सरकारच्या मागासवर्गांसाठी शिष्यवृत्त्या (Govt. of India Scholarship)

भारत सरकारच्या मागासवर्गीयांसाठी शिष्यवृत्त्या (Govt. of India Scholarship) भारत सरकार अनुसूचित जाती (Scheduled Caste) अनुसूचित जमाती (Schduled Tribes) व विमुक्त व भटक्या जमाती (Denotified / Nomadic Tribes) इतर मागास वर्ग (O.B.C.) च्या विद्यार्थ्यांना दरवर्षी सर्व फी व राहण्याकरिता काही रक्कम अशा शिष्यवृत्त्या (Scholarship) देते.

## ६. शासकीय व इतर शिष्यवृत्त्या सवलती (Govt. of Scholarship and Freeships)

अनुसूचित जाती, जमाती व इतर मागास जमातीच्या विद्यार्थ्यांचे पालकाचे उत्पन्न ठरवून दिलेल्या उत्पन्नापेक्षा जास्त नसेल तर त्यांना महाराष्ट्र शासनाकडून शिष्यवृत्ती मिळेल.

अ) विद्यार्थी सहाय्य निधीतुन महाविद्यालयातील काही गरजु व होतकरु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

## ७. सर्व सामान्य शिस्त (General Discipline)

महाविद्यालयातील जबाबदार अधिकारी व्यक्तींनी घालुन दिलेल्या नियमांचे पालन विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक आहे. महाविद्यालयाच्या आवारात वर्गामध्ये विद्यार्थ्यांची वर्तणूक चांगली व दुसऱ्यास सुखकर असावी.

## ८. ग्रंथालय (Library) :

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयामध्ये उत्तम ग्रंथालयाची व वाचनालयाची सोय केलेली आहे. ग्रंथालयाचे व वाचनालयाचे सविस्तर नियम ग्रंथालयामध्ये सुचना फलकावर लावण्यात आलेले आहेत. त्या नियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील. नियमांचे उल्लंघन केल्यास त्या विद्यार्थ्याला दंड करण्यात येईल. ग्रंथालयात स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त असलेली मासिके व पुस्तके उपलब्ध आहेत.

## ९. शारीरिक शिक्षण (Physical Education) :

अमरावती विद्यापीठाच्या ऑर्डीनन्स क्रमांक तीन नुसार तृतीय वर्ष कला व बी.कॉम. अन्त्य या वर्गातील विद्यार्थी सोडून बाकी सर्व वर्गातील विद्यार्थी करिता शारीरिक शिक्षणाच्या वर्गाची सोय करण्यात आली आहे.

## ११. राष्ट्रीय सेवा योजना (National Service Scheme) (N.S.S.)

महाविद्यालयास रा.से.यो पथकाची संत गाडगेबा अमरावती विद्यापीठाकडून १०० विद्यार्थ्यांची मान्यता मिळालेली आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांनाच या योजनेतुन विद्यार्थ्यांना सामाजिक सेवा करण्याची संधी मिळावी व ग्रामीण भागातील ग्रामस्थांचे जीवनमान जाणुन त्यांच्याशी समरस होता यावे हा या योजनेचा मुख्य हेतु आहे.



S.K.A.MALKAPUR

Plate
6

# ४. इतर शुल्क व निधी (Other Fees & Funds)

खालील प्रकारचे शुल्क अथवा निधी प्रवेशाचे वेळी द्यावा लागेल.

| Sr. No. | Fee Structure | B.A.I | B.A.II | B.A.III | B.Com.I | B.Com.II | B.Com.III |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Full Pay Students | Full Pay Students | Full Pay Students | Full Pay Students | Full Pay Students | Full Pay Students |
| | | Rs. | Rs. | Rs. | Rs. | Rs. | Rs. |
| | **A] UNIVERSITY FEE** | | | | | | |
| 1 | Enrollment Fee | 120 | 0 | 0 | 120 | 0 | 0 |
| 2 | Annual Fee | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 85 |
| 3 | Student Welfare Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 4 | Student Council Fee | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 5 | Gamesh & Sports | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 6 | I.S.U.M. Ashwamegh Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 7 | Emergency Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 8 | Corpus Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 9 | Student Insurance Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 10 | Uni. Adhyasan | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 11 | E - Suvidha | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| | **B] COLLEGE FEE** | | | | | | |
| 1 | Tuition Fee | 2400 | 2400 | 2400 | 2400 | 2400 | 2400 |
| 2 | Lab. Fee (Computer) | 0 | 0 | 0 | 1600 | 1600 | 1600 |
| 3 | Identity Card | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 4 | Vehicle Stand Fee | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 5 | Security | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 6 | Administrative Charges | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 7 | College Examination Fee | 120 | 120 | 120 | 120 | 120 | 120 |
| 8 | Development Fund | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 9 | Environmental Studies Fee | 0 | 160 | 0 | 0 | 160 | 0 |
| 10 | College Gathering Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 11 | Library Fee | 160 | 160 | 160 | 160 | 160 | 160 |
| 12 | Games & Sports | 160 | 160 | 160 | 160 | 160 | 160 |
| 13 | Extra Curricular Activities | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 85 |
| 14 | Medical Exam Fee | 55 | 55 | 55 | 55 | 55 | 55 |
| 15 | Physical Efficiency Test | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 16 | Student's Aid Fund | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 17 | College Magzine Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 18 | Facility Fee | 85 | 85 | 85 | 85 | 85 | 85 |
| 19 | Exam Fee | | | | | | |
| 20 | Misc./ Fine | | | | | | |
| | **TOTAL FEE** | **3900** | **3940** | **3780** | **5500** | **5540** | **5380** |



## २) कॉमर्स विभाग

### १) B.Com. Part I - Sem. I : *(Eng. & Marathi Medium) (CBCS)*

1] English (DSC) 19001
2] Business Communication Skill in English 19002
3] Marathi (DSC) 19003
4] Communication Skill in Marathi (AEC) 19003 (P)
5] Principle of Accountancy (DSC) 19009
6] Principle of Business Economics (DSC) 19010
7] Principle of Business Management (DSC) 19011
8] Computer Fundamental & Operating System I 19012
9] Computer Fundamental & Operating System I 19013
10] Induction Programme Ind01

### २) B.Com. Part I - Sem. II : *(Eng. & Marathi Medium) (CBCS)*

1] English (DSC) 19131
2] Business Communication Skill in English 19132
3] Marathi (DSC) 19133
4] Communication Skill in Marathi (AEC) 19133 (P)
5] Principle of Accountancy (DSC) 19140
6] Principle of Business Economics (DSC) 19141
7] Principle of Business Management (DSC) 19142
8] Computer Fundamental & Operating System I 19143
9] Computer Fundamental & Operating System I 19144

**Generic open Elective course :** i) Persnality Development & Soft Skill
ii) Discovery of Bharat

### ३) B.Com. Part II - Sem. III : *(Eng. & Marathi Medium)*

विषय CBCS पॅटर्ननुसार राहतील.

### ४) B.Com. Part II - Sem. IV : *(Eng. & Marathi Medium)*

विषय CBCS पॅटर्ननुसार राहतील.

### ५) B.Com. Part III - Sem. V : *(Eng. & Marathi Medium)*

1] English (1001)
2] Marathi (1011)
3] Cost Accounting (3051)
4] Business Environment (3052)
5] Business Regulatory Frame Work (3053)
6] Internet & WWW-I (3058)
7] E-Commerce-I (3059)





S.K.AMALKAPUR

# करिअर कटट्याविषयक माहिती


महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद यांच्या संयुक्त विद्यामाने " करिअर कटटा " हा उपक्रम " २५ फेब्रुवारी २०२१ " पासून आतापर्यत राज्यातील सर्व महाविद्यालयामध्ये सुरू आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी वर्षभर सातत्याने करिअर विषयक मार्गदर्शन करणारा महत्वकांक्षी उनक्रम राबवला जात आहे. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षा, उद्योजकता विकास, कौशल्य विकास यासारखे मार्गदर्शन तसेच महाविद्यालयांसाठी सामंजस्य करारा अंतर्गत कौशल्य विकास केंद्राव्दारे विशेष अभ्यासक्रम, इनक्यूबेशन सेंटर, कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र इत्यादी उपक्रम राबवले जात आहेत. राज्यभरातील सर्व विद्यापीठे, हजारो महाविद्यालये आणि लाखो विद्यार्थी या प्रकल्पात सहभागी झालेले आहेत. प्रत्येक शैक्षणिक संस्थाच्या सन्माननीय संचालक मंडळाचे प्रतिनिधी, प्राचार्य आणि प्राध्यापक या महत्वपूर्ण घटकांच्या सहकार्याने हे अभियान यशस्वी ठरले आहे.

आपल्या महाविद्यालयात शैक्षणिक सत्र २०२३—२०२४ पासुन करिअर कटटा हा उपक्रम सुरू होत आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात नोंदणी करावी.









# EDUCATION

*is not the learning of facts*
but the training of the
***mind to think.***

- Albert Einstein

S.K.KAMALKAPUR